दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.१७ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २३१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 17 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 231 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

## मंत्री-आमदारांच्या प्रतापांमुळे एकनाथ शिंदे संतप्त

# जबाबदारीने वागा अन्यथा कावाईचा बडगा उगारावा लागेल; शिवसेनेच्या मंत्र्यांना इशारा

मुंबई (वृत्तसंस्था)-सत्ताधारी शिवसेनेतील काही मंत्र्यांच्या आणि आमदारांच्या वादग्रस्त वर्तनामुळे पक्षावर टीकेची झोड उठत असताना, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अखेर कडक भूमिका घेत आपल्या मंत्री आणि आमदारांची कानउघाडणी केली आहे. काही मंत्र्यांना यापूर्वी बदनामीमुळे पद गमवावे लागले. सत्तेची हवा डोक्यात जाऊ देऊ नका, तुमच्यावरही अशी कारवाई करण्याची वेळ येऊ देऊ नका, असा गंभीर इशारा शिंदे यांनी सोमवारी शिवसेनेच्या मंत्री आणि आमदारांना दिला.गेल्या काही दिवसांत शिवसेनेच्या काही नेत्यांचे कारनामे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीनमधील कर्मचाऱ्याला केलेली मारहाण, तर मंत्री संजय शिरसाट यांच्या बॅगेतून रोख रक्कम असल्याचा व्हिडीओ समोर आला. यामुळे विरोधक आणि घटकपक्षांकडूनही शिंदे यांच्या पक्षाला लक्ष्य केले जात आहे. त्यामुळे नाराज झालेल्या शिंदे यांनी आज सावकर स्मारक येथे झालेल्या पक्षाच्या बैठकीत स्वपक्षीय मंत्री आणि आमदारांची कानउघडणी करीत निर्वाणीचा इशारा दिला.



गेल्या काही दिवसांत काही गोष्टी घडल्या, तुमच्याकडे दाखवलेले बोट माझ्याकडे असते. तुमचे आमदार काय करतात? असा प्रश्न मला विचारला जातो. तुम्ही सगळी माझी माणसे आहात. आपले कुटुंब एक आहे. तुमची बदनामी म्हणजे माझी बदनामी आहे. चुकीच्या गोष्टींवर एनर्जी वाया घालवू नका. कमी बोला जास्त काम करा, बदनामीमुळे काही मंत्र्यांना घरी जावे लागले, असे म्हणत यावेळी एकनाथ शिंदे यांनी आपल्या आमदार आणि मंत्र्यांना अप्रत्यक्ष इशाराही दिला आहे.आपल्या पक्षाला कमी वेळात जास्त यश मिळाले आहे. राज्यातील जनता आपल्या पाठीशी आहे. त्यामुळेच बदनामीचे डाव रचले जात आहेत. अशावेळी प्रत्येकाने प्रत्येक गोष्टीची काळजी घ्या. यापुढील काळ कसोटीचा आहे. सामाजिक जीवनात पथ्य पाळावी लागतात. ती काळजी घ्या असे सांगतानाच बदनामीमुळे काही मंत्र्यांना घरी जावे लागले. याचे भाव ठेवा असा अप्रत्यक्ष इशाराही शिंदे यांनी दिला.यापुढे कोणाचीही चूक खपवून घेतली जाणार नाही. मंत्री आणि आमदारांनीही जबाबरीने वागावे अन्यथा कावाईचा बडगा उगारावा लागेल,असा इशाराही त्यांनी दिल्याचे समजते.पुढे बोलताना ते म्हणाले की, आपल्या परिवारावर कारवाईचा बडगा उगारायला मला अजिबात आवडणार नाही. परंतु, मला कारवाई करावी लागणार नाही, तसेच काम तुमच्याकडून अपेक्षित आहे. मी रागावत नाही. मी प्रमुखा सारखे वागत नाही. कार्यकर्त्या सारखे वागतो. तुम्हीही तसेच वागा. आपल्या डोक्यात हवा जाऊ देता कामा नये. कितीही पदे मिळाली तरी कार्यकर्ता आहे, असेच समजून कामे करा, असा सल्ला एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्री आणि आमदारांना दिला.



सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष श्री.कल्याण (काका )आखाडे व सावता परिषदेचे बीड जिल्हा अध्यक्ष किशोर राऊत यांनी शिवसेना संपर्क कार्यालय केज येथे सदिच्छा भेट दिली त्यावेळी त्यांचा सत्कार करताना ज्येष्ठ नेते मालोजी (नाना) गलांडे पाटील ,दादासाहेब शंकरराव ससाणे शिवसेना विधानसभा प्रमुख केज तथा माजी उपसभापती पंचायत समिती केज नारायण (दादा) शिंदे,माजी पंचायत समिती सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.


# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन लढवणार

### इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा; तालुकाध्यक्ष अ‍ॅड.प्रकाश मुंडे यांचे आवाहन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन मैदानात उतरणार असून, पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना सोबत घेतले जाणार आहे. त्याचबरोबर नव्याने पक्षबांधणी सुरू असून, इच्छुकांनी आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.

अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील साहेब , माजी मंत्री अशोकरावजी पाटील साहेब, बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे साहेब , अखिल भारतीय राष्ट्रीय किसान समन्वयक बाबुराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद सर्कल, पंचायत समिती गण तसेच गावागावात काँग्रेस पक्षाची बांधणी करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना तर संधी मिळेलच परंतु नव्याने पक्षात येऊ इच्छित असलेल्या सर्वांना समान न्यायाने संधी दिली जाईल. त्यामुळे पक्ष संघटनेत काम करण्याची इच्छा असेल किंवा आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून भाग घेण्याची इच्छा असेल अशा कार्यकर्त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.



# पैठणच्या उजव्या कालव्यातून पाणी सोडा मा.राज्यमंत्री बदामराव पंडित यांची मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यात बहुतांश भागात पेरणी झालेली आहे तर काही ठिकाणी धूळपेरणी झालेली आहे. मात्र पावसाने दडी मारल्याने मोठ्या प्रमाणावर पिकाचे नुकसान होण्याची शक्यता आहे. गेवराई तालुक्यासह इतर तालुक्यातील सुकणारी आणि करपणारी पिके वाचवण्यासाठी तात्काळ उजव्या कालव्यातून पाणी सोडावे अशी मागणी शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केली आहे.



गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाणी प्रश्नावर सातत्याने आंदोलन करणारे शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी यापूर्वीही उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यासाठी पैठण येथील नाथसागराचे दरवाजे उघडण्याचे मोठे आंदोलन केले होते. त्यानंतर गेवराई तालुक्यातील उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आल्याने शेतकऱ्यांची मोठी नुकसान ठरले होते. यावर्षीही गेवराई तालुक्यात जून आणि जुलै मध्ये अत्यल्प पाऊस झाल्याने ऊस लागवड आणि इतर पिकांची पेरणी केलेले शेतकरी हातबल होताना दिसत आहेत. गोदावरीच्या पात्रालगत आणि कॅनॉल च्या पानावर आधारित अनेक शेतकऱ्यांनी ऊस लागवड केली आहे. मात्र पावसा अभावी ऊस पिवळा पडत आहे. खरीप पिकेही मोठ्या प्रमाणावर सुकू लागली आहेत. तर काही भागात ती करपली आहेत. पैठणच्या नाथसागरातून येणाऱ्या उजव्या कालव्यातून पाणी सोडल्यास या भागातील शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान मिळेल, अशी भावना या भागातील बहुतांश शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या उजव्या कालव्यातून तात्काळ पाणी सोडून पिकांना जीवदान द्यावे अशी मागणी शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केली आहे.

# बीड जिल्हयामध्ये जागतिक युवा कौशल्य दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**


जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बीड आणि जन शिक्षण संस्थान, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १५ जूलै २०२५ रोजी जागतिक युवा कौशल्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधुन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सदरील कार्यक्रमात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बीड मार्फत आयोजीत करण्यात येणा-या पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा अंतर्गत सहभागी होणाऱ्या आस्थापना, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत वैयक्तिक व्याज परतावा योजनेअंतर्गत लाभ घेवुन उद्योजक झालेले लाभार्थी, कौशल्य विकास योजनेअंतर्गत उत्कृष्ट प्रशिक्षण देणा-या प्रशिक्षण संस्था यांचा सन्मान करण्यात आला. तसेच प्रशिक्षणार्थीसाठी आयोजीत कौशल्य विकास काळाची गरज या विषयावरील निबंध स्पर्धा आणिसौदर्य व वेशभुषा स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतुन कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते टुलकिटचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बीड या कार्यालयातील सर्व कर्मचा-यांचा त्यांनी १०० दिवसांचा कार्यक्रम या शासनाच्या उपक्रमात केलेल्या कामकाजाबाबत सन्मान करण्यात आला.कार्यक्रम प्रसंगी श्री. सुशिल उचले, सहायक आयुक्त, श्री. समाधान किरवले, कौशल्य विकास अधिकरी, श्री. उपेंद्र कुलकर्णी, अध्यक्ष, जन शिक्षण संस्थान, श्रीमती. डॉ. चोले मॅडम, उपाध्यक्ष, जन शिक्षण संस्थान, श्री. गंगाधर देशमुख, संचालक, जन शिक्षण संस्थान, श्रीमती. बागलाने मॅडम, श्री. अमोल मुळे, श्री. नितीन क्षीरसागर, आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. अशाप्रकारे बीड जिल्हयात जागतिक युवा कौशल्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# पाटोदा न.पं.च्या कारभारावर मुस्लिम समाज नाराज मुस्लिम समाज बांधवाच्या कब्रस्तानमध्ये सर्वत्र अंधार

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील मुस्लिम समाजाला नगरपंचायतीच्या ढिसाळ कारभाराचा फटका बसत असून, येथील मुस्लिम समाज कब्रस्तानमध्ये मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. विशेषतः, कब्रस्तानमध्ये प्रकाशाची (लाईटची) सोय नसल्याने रात्रीच्या वेळी अंत्यसंस्कार आणि इतर धार्मिक विधी करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.गेल्या अनेक दिवसांपासून ही समस्या भेडसावत असतानाही पाटोदा नगरपंचायत प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप मुस्लिम समाजातील नागरिकांनी केला आहे. रात्रीच्या वेळी मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी येणाऱ्या लोकांना अंधारामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यामुळे मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना आणि उपस्थित असलेल्यांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.कब्रस्तान हे आमच्यासाठी अत्यंत पवित्र स्थान आहे. येथे मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. प्रकाशा अभावी आम्हाला अनेक अडचणी येत आहेत, असे एका स्थानिक मुस्लिम नागरिकाने सांगितले.या गंभीर समस्येकडे पाटोदा नगरपंचायतीने तात्काळ लक्ष घालून कब्रस्तानमध्ये लवकरात लवकर प्रकाशाची सोय करावी, अशी मागणी मुस्लिम समाजाने केली आहे.



## संपादकीय..

# नकारात्मक पुनरावलोकन



सोशल मीडियावर इन्फ्लुएन्सर एखाद्या उत्पन्नाबाबत आपलं मत, अभिप्राय देत असतात. अनेकदा त्यांना यासाठी पैसे मिळतात. मात्र एखाद्या उत्पादनाबद्दल केलेलं नकारात्मक पुनरावलोकन त्या इन्फ्लुएन्सरला महागात पडू शकतं. मात्र हे देखील तितकच खरं की, त्या उत्पादनाबद्दल दिलेला रिव्ह्यू हा पुराव्यानिशी दिला असेल, तर आपले मत मोकळेपणे मांडण्याचा अधिकार त्या इन्फ्लुएन्सरला असतो. त्याचाच आढावा या लेखात घेतला आहे.जेव्हा आपण एखादी वस्तू ऑनलाइन खरेदी करतो तेव्हा आपण त्याची किंमत, वॉरंटी, वस्तू परत करण्याच्या अटी पाहतो. त्याचबरोबर त्याचा आकार, रंग, वजन याही बाबी तपासून घेतो. याशिवाय आपण तपासतो ते म्हणजे रिव्ह्यू. ती वस्तू कशी आहे याबद्दलचे लोकांचे अभिप्राय. बहुतेक वेळा ते छानच असतात. बऱ्याचदा सोशल मीडियावर इन्फ्लुएन्सर एखाद्या वस्तूबद्दल काही तरी सांगत असतात, प्रात्यक्षिक देत असतात. त्यामुळे आपल्याला वस्तूची माहिती आधी चांगल्या पद्धतीने होत असते.इंस्टाग्राम, एक्स, व्हॉट्सॲपसारख्या अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इन्फ्लुएंसर वस्तूबद्दल भरभरून बोलतात. त्याबद्दल त्यांना पैसे मिळतात. त्याचबरोबर इतर ग्राहक आपापली मते मांडत असतात. त्यातील एखादे मत विरुद्ध असू शकते. असे मत वाचल्यावर आपले त्या वस्तूबद्दल मत बदलू शकते. ऋइन्फ्लुएन्सर्सनी उत्पादनाबद्दल अतिशयोक्ती करू नये हे सर्वांनाच पटेल. तथापि विरुद्ध काही बोलायचेच नाही, त्यात उत्पादकांचा अपमान, बदनामी होते हे मान्य होणे कठीण. नेमका असाच निर्णय नुकताच दिल्ली उच्च न्यायालयाने सॅन न्यूट्रिशन आणि इन्फ्लुएंसर अर्पित मंगल यांच्यातील वादावर दिला. अर्पित मंगल आणि इतर मिळून चार इन्फ्लुएंसरनी सॅन न्यूट्रिशन उत्पादित 'व्हे प्रोटीन' उत्पादनाबद्दल विरुद्ध टिप्पणी केली. अर्थातच असे नकारात्मक पुनरावलोकन सॅन न्यूट्रिशनला परवडणारे नव्हते. त्यांनी अर्पित मंगल आणि इतरांना असे करण्यापासून रोखण्याचा अंतरिम आदेश देण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली. अंतरिम अशासाठी की त्यात इतरही अनेक बाबींचा विचार होणे आवश्यक होते.

सॅन न्यूट्रिशन पौष्टिक पूरक पदार्थांची विक्री करणारी कंपनी आहे. न्यायमूर्ती अमित बन्सल सुनावणीच्या सुरुवातीला म्हणाले की, आपल्या देशात भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. त्यामुळे पूर्ण खटला सुरू होण्यापूर्वीच असे निर्बंध घालणे अवास्तव ठरेल. वाजवी टीकाटिप्पणी आणि विडंबन हे संविधानाच्या अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारात संरक्षित आहे. अंतरिम मनाई आदेश दिल्याने त्यांच्या भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारावर बंधने येतील आणि आरोग्याच्या बाबींवरील माहिती जनतेपासून वंचित राहील असे म्हणून न्यायालयाने अंतरिम आदेश देण्याची सॅन न्यूट्रिशनची याचिका फेटाळली. इन्फ्लुएंसर केलेली अशी टीका बदनामी, अपमान किंवा ट्रेडमार्कचे उल्लंघन आहे का आणि अशा संदर्भात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार किती प्रमाणात आहे हे मुद्दे देखील तपासण्यास आले. २ डिसेंबर २०२४ रोजी दिलेल्या आदेशात, न्यायमूर्ती अमित बन्सल यांनी या प्रकरणात तपासण्यासाठी महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा उपस्थित केला होता. तो म्हणजे संविधानाच्या कलम १९(१)(अ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादा जेव्हा कलम १९(२) अंतर्गत वाजवी निर्बंधांसह वाचल्या जातात, तेव्हा त्या अबाधित राहिल्या पाहिजेत. मग त्या प्रभावकांनी तृतीय-पक्षाच्या वस्तू आणि सेवांबद्दल केलेल्या विरोधी टिप्पणी का असेना! न्यायालयाने ब्रँडची प्रतिष्ठा आणि आर्थिक हितसंबंध, व्यक्तीचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य / जनतेचा माहिती प्राप्त करण्याचा अधिकार या तीन स्पर्धात्मक अधिकारांमध्ये संतुलन कसे राखायचे याबद्दल मित्रांना विचारले. त्यावर मित्रांनी असा युक्तिवाद केला की, अशा प्रकरणांमध्ये सामान्यतः तीन कारणे असतात. १. बदनामी, जी प्रतिष्ठेच्या हितसंबंधांशी संबंधित २. आर्थिक हितसंबंध आणि ३. ट्रेडमार्कचे उल्लंघन. न्यायालयाने मान्य केले की, व्यवसायांची प्रतिष्ठा संरक्षणास पात्र असली तरी संतुलित आणि पुराव्यांचा आधार असल्यास टीकात्मक टिप्पणी योग्य ठरते. प्रभावशाली विपणन दुहेरी भूमिका बजावते-उत्पादनांचा प्रचार त्याचबरोबर ग्राहकांचे हित जपण्याचे काम करते. युरोफिन्स आणि मायक्रो टेक लॅबोरेटरीसह तीन वेगवेगळ्या एनएबीएल-मान्यताप्राप्त प्रयोगशाळांनी - उत्पादनाची चाचणी केली आणि त्यात जाहिरात केलेल्यांपेक्षा कमी प्रथिने आढळली. सॅन न्यूट्रिशन हे पुरावे खोडू शकली नाही. प्रभावकांपैकी एकाने त्याचे वर्णन 'घटिया' (कनिष्ठ) असे केले होते. न्यायालय म्हणाले, 'घटिया' या शब्दाचा अर्थ 'निकृष्ट दर्जा'पेक्षा जास्त काहीही नाही. अतिशयोक्ती किंवा अतिरेक यात बदनामी नाही. व्यंगात्मक कडक भाषेचा वापर परवानगी योग्य आहे. व्हिडीओमध्ये वापरलेले व्यंग्यात्मक संदर्भ हे अभिव्यक्तीचे संरक्षित प्रकार आहेत. पुराव्यातील व्हिडीओंचे सार केवळ ग्राहकांना शिक्षित करणे आहे. त्यामुळे हे प्रामाणिक मत ठरते.

ट्रेडमार्क उल्लंघनाच्या दाव्यांचे निराकरण करताना, न्यायालयाने असा निर्णय दिला की, पुनरावलोकनाच्या उद्देशाने ब्रँडचा उल्लेख करणे हे १९९९ च्या ट्रेडमार्क कायद्यानुसार उल्लंघन होत नाही. प्रतिवादींनी वादीच्या चिन्हांचा वापर व्यापारासाठी नाही तर केवळ वस्तूंचे पुनरावलोकन करण्यासाठी केला आहे. न्यायाधीश बन्सल यांनी यावर भर दिला की, अंतरिम मनाई आदेश देणे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अन्याय्य अंकुश असेल. त्यामुळे आरोग्याशी संबंधित उत्पादनांबद्दलच्या माहितीपासून जनता वंचित राहील. घटनात्मक महत्त्व लक्षात घेता, न्यायालयाने अनुक्रमे गुगल आणि मेटा यांचे प्रतिनिधित्व करणारे वकील आदित्य गुप्ता आणि वरुण पाठक यांना ॲमिसी क्युरी म्हणून सबमिशन दाखल करण्यासाठी आमंत्रित केले होते.

# पावसाच्या पॅटर्नमधील बदल चिंताजनक!

भारतात पूर्वी मुसळधार पावसामुळे अनेक दिवस जनजीवन विस्कळीत होत असे. सूर्य दिसत नसे. काम थांबत असे. वाहतुकीवर मोठा परिणाम होत असे; परंतु गेल्या तीन दशकांत मॉन्सूनचा पॅटर्न इतका बदलला आहे की, पाऊस सतत पडत नाही. काही ठिकाणी काही तासांमध्ये इतका मुसळधार पाऊस पडतो की पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. हे चित्र का बदलले आहे, याचा विचार करायला हवा.भारतात १९५० ते १९८०च्या दशकापर्यंत अनेक भागांत, विशेषतः पश्चिम घाट (जसे की महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ), ईशान्य भारत (आसाम, मेघालय) आणि गंगेच्या मैदानात जून ते सप्टेंबर या काळात पाच ते दहा दिवस सतत हलका ते मध्यम पाऊस पडणे सामान्य होते. काही ठिकाणी हा कालावधी आणखी जास्त, १५-२० दिवस असू शकतो. पूर्वी मॉन्सूनचा पॅटर्न अधिक स्थिर आणि समान रीतीने वितरित केला जात असे. सतत ढग असायचे. पाऊस अनेक दिवस अधूनमधून किंवा हलक्या रिमझिम पावसाच्या स्वरूपात सुरू असायचा. हा तो काळ होता, जेव्हा लोक म्हणायचे की इतका पाऊस पडत होता की, बरेच दिवस सूर्य दिसत नव्हता. महात्मा गांधींनी त्यांच्या आत्मचरित्रात आईच्या उपवासाबद्दल लिहिले आहे. महात्मा गांधींच्या आई पुतळीबाई चातुर्मासात सूर्यदर्शन उपवास करत असत. या उपवासात त्या सूर्याला पाहिल्याशिवाय जेवत नव्हत्या. गांधीजींनी त्यांच्या 'सत्याच्या प्रयोगांची कहाणी' या आत्मचरित्रात याचा उल्लेख केला आहे. त्यांनी लिहिले आहे की पावसाळ्यात बरेच दिवस ढग राहतात आणि सूर्य दिसत नव्हता, तेव्हा त्यांची आई दोन-तीन दिवस जेवत नव्हती. त्या काळात तरुण मोहनदास (गांधी) सकाळपासूनच आकाशाकडे लक्ष ठेवत; जेणेकरून सूर्य दिसताच ते आईला कळवू शकतील आणि ती उपवास सोडू शकेल. गांधीजींच्या आत्मचरित्रात लिहिलेली ही बाब १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या सुरुवातीला गुजरातमधील पोरबंदरसारख्या भागांशी संबंधित आहे. तिथे पावसाळ्यात सहा-सात दिवस सतत ढग आणि पाऊस पडणे सामान्य होते.

त्या काळात साधारणपणे पावसाळ्याच्या शिखरकाळात अशी परिस्थिती वारंवार दिसून येत असे. भारतातील ग्रामीण भागात 'आठवडाभर पाऊस' किंवा 'सतत मुसळधार पाऊस' पडत असे. त्याचा शेती आणि जीवनशैलीवर परिणाम होत असे. भारतीय हवामान खात्याच्या (आयएमडी) जुन्या रेकॉर्डनुसार (१९०१-१९८०) सामान्य पावसाळ्यात भारतातील अनेक भागात ५०-१०० पावसाळी दिवसांची नोंद होते. त्यापैकी बऱ्याच वेळा पाच-दहा दिवस सतत पाऊस पडत असे. पश्चिम घाट (महाराष्ट्र, गोवा, केरळ) भागात जून-जुलैमध्ये ७-१५ दिवस सतत पाऊस पडल्याच्या नोंदी आढळतात. ईशान्य भारत-मेघालयसारख्या भागात २०-३० दिवस अधूनमधून पाऊस पडणे सामान्य होते. उत्तर भारतात (उत्तर प्रदेश, बिहार) पाच-दहा दिवस वारंवार पावसाचा कालावधी येत असे. पूर्वीच्या तुलनेत आता हवामान बदलामुळे पावसाचा पॅटर्न बदलला आहे. आता दीर्घकालीन हलका पाऊस कमी पडतो. त्याऐवजी थोड्याच वेळात मुसळधार पाऊस पडतो. गेल्या तीन ते चार दशकांमध्ये पावसाच्या पद्धतीत बदल होण्यामागे अनेक कारणे आहेत. तथापि, हा बदल केवळ भारतासाठी नाही तर, संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय आहे. गेल्या काही दशकांमध्ये भारतासह जगभरात सरासरी तापमान वाढले. त्यामुळे हवामानामध्ये असामान्यता निर्माण झाली आहे. तापमानात वाढ झाल्यामुळे वातावरणातील आर्द्रता क्षमता वाढते. त्यामुळे कधीकधी काही दिवसांमध्ये मुसळधार पाऊस पडतो. पॅसिफिक महासागरात होणाऱ्या 'एल निनो'सारख्या घटनांमुळे भारतात मॉन्सून कमकुवत होऊ शकतो. परिणामी, पावसाचा कालावधी आणि प्रमाणही कमी होते. पूर्वी हे प्रमाण कमी होते; परंतु आता त्यांचा परिणाम अधिक दिसून येतो. आता अवघ्या काही तासांमध्ये इतका मुसळधार पाऊस पडतो की, पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. अलीकडच्या काही वर्षांमध्ये मॉन्सून कधी लवकर येतो, कधी उशिरा येतो. कधी कधी मॉन्सून एकाच दिवसात अनेक राज्यांमध्ये पोहोचतो. त्यामुळे पावसाचे वितरण असमान होते. शहरीकरण आणि नैसर्गिक संसाधनांचे शोषण यांचा स्थानिक हवामान आणि पावसाच्या चक्रावरही परिणाम होतो. भारतात रिमझिम किंवा हलका पाऊस कमी होत आहे. मॉन्सूनचे वारे आता पूर्वीसारखे सतत ओलावा आणत नाहीत. त्यामुळे रिमझिम पावसाचा कालावधी कमी झाला. 'आयएमडी'च्या (१९५१-२०१५) अभ्यासानुसार भारतात हलक्या पावसासह दिवसांच्या संख्येत १०-१५ टक्के घट झाली, तर मुसळधार पाऊस २०-३० टक्के वाढला. पश्चिम घाट आणि ईशान्य भारतात अजूनही हलका पाऊस पडतो; परंतु त्याचा कालावधी आणि नियमितता पूर्वीपेक्षा कमी आहे. मेघालयसारख्या भागात अजूनही रिमझिम पाऊस पडतो; परंतु एकूणच कमी कालावधीत पडतो. मध्य आणि उत्तर भारतात हलका पाऊस लक्षणीयरीत्या कमी झाला. त्याऐवजी पूर किंवा दुष्काळासारख्या हवामान घटनांमध्ये वाढ झाली. तामिळनाडू आणि केरळमध्ये अजूनही मॉन्सून आणि ईशान्य मॉन्सूनदरम्यान हलका पाऊस पडतो; परंतु सातत्याचा अभाव आहे. या वर्षी मुसळधार पावसामुळे मे महिन्यात हवामान थंड झाले. फेब्रुवारीमध्ये अचानक हिवाळ्याची जागा वसंत ऋतूने घेतली. जूनमध्ये पावसानंतर उष्णतेची लाट आली. मे महिन्यात उष्णतेच्या लाटांऐवजी अनेकांनी थंड वाऱ्याचा आनंद घेतला. काही भागांमध्ये उष्णतेऐवजी वेगळ्या पावसाचा अनुभव आला. नंतर मान्सूनची प्रगती थांबली. यासाठी जबाबदार असलेल्या पश्चिमी विक्षोभां(वेस्टर्न डिस्टर्बन्स)ची वारंवारता कमी झाली. जूनच्या पहिल्या आठवड्यापासून पंजाब, हरियाणा, चंदिगड, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेशचा काही भाग आणि पूर्व राजस्थान, दक्षिण उत्तर प्रदेश आणि वायव्य मध्य प्रदेश या भागांना उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागला. 'कोपर्निकस क्लायमेट चेंज सर्व्हिस'ने जून २०२३ मध्ये जाहीर केले होते की, सरासरी जागतिक तापमान अनेक दिवस औद्योगिकपूर्व पातळीपेक्षा १.५ अंश सेल्सिअसने जास्त होते. २०२४ मध्ये जागतिक तापमानवाढीने लक्ष्मणरेखा १.५ अंश ओलांडली असल्याचे पुन्हा एकदा सांगितले गेले. 'शिफ्टिंग झोन ऑफ ऑक्युरन्स ऑफ एक्स्ट्रीम वेदर इव्हेंट्स-हीट वेव्हज'च्या अलीकडील अभ्यासानुसार उष्णतेच्या लाटा आता राजस्थान किंवा विदर्भापुरत्या मर्यादित नाहीत. अरुणाचल प्रदेश, केरळ आणि जम्मू आणि काश्मीरसारख्या पारंपरिकपणे थंड मानल्या जाणाऱ्या राज्यांमध्येही गेल्या दोन दशकांमध्ये उष्णतेच्या लाटा आल्या आहेत. भारतीय कृषी संशोधन परिषदेचा अहवालदेखील याची पुष्टी करतो. अलीकडच्या एका मूल्यांकनानुसार उत्तराखंडच्या पर्वतरांगांमध्ये २७ टक्के अन्नधान्य आणि तेलबिया पिकांचे नुकसान होऊन उत्पादन १५ टक्क्यांनी कमी झाले. पाच वर्षांमध्ये बटाट्याचे उत्पादन ७० टक्क्यांनी कमी झाले. त्यात अल्मोडा आणि रुद्रप्रयागमध्ये सर्वात मोठी घट झाली.

भारतीय हवामान विभागाचे माजी महासंचालक डॉ. के. जे. रमेश यांच्या मते, हवामानबदलामुळे आग्नेय वातावरणातील आर्द्रतेची पातळी वाढली आहे. तापमानात प्रत्येक एक अंश वाढीमुळे हवेची पाण्याची वाफ धरून ठेवण्याची क्षमता सात टक्क्यांनी वाढली. सर्व डोंगराळ राज्यांमध्ये तापमानात दोन ते चार अंश वाढ झाली. 'आयपीसीसी' अहवालात वेट-बल्ब तापमानाचा उल्लेख आहे. ते तापमान मोजताना मुळात उष्णता आणि आर्द्रता जोडते. सामान्य माणसासाठी, ३१ अंश सेल्सिअसचे वेट-बल्ब तापमान अत्यंत धोकादायक असते. ३५ अंश सेल्सिअस तापमानात सावलीत विश्रांती घेणाऱ्या निरोगी प्रौढ व्यक्तीलादेखील सुमारे सहा तासांपेक्षा जास्त काळ जगणे कठीण होते. नवीन संशोधनातून दिसून आले आहे की, दक्षिण भारतातील जोरदार वारे आर्द्रता चांगल्या प्रकारे पसरवत आहेत. हे हवेतील मोठ्या प्रमाणात बदलांचे लक्षण आहे, जे मॉन्सून प्रणालींच्या हालचालीवरदेखील परिणाम करू शकतात. मॉन्सूनमधील हे घातक बदल रोखण्यासाठी आता पर्यावरण संरक्षणावर अधिक भर दिला पाहिजे.



# भ्रष्टाचाराचे पूल

गेल्या काही महिन्यांपासून देशामध्ये पूल कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे पुलांची सुरक्षितता हा विषय सध्या ऐरणीवर आला. एकतर पूल अनेक वर्षे जुने असल्याने जीर्ण झालेले असतात. त्यांचा वापर करण्याची कालमर्यादा संपुष्टात आल्यावरही वापर सुरूच असतो. त्यामुळे धोकादायक अवस्थेत वापर सुरू असणाऱ्या पुलांचा अंत हा अपघातांमध्ये ठरलेलाच असतो. या पुलावरून जाणे धोकादायक आहे, हे माहीत असतानाही जीव मुठीत घेऊन वाहनचालक आपली वाहने या पुलावरून हाकतात. दुसरीकडे जुनाट पुलांची दुर्घटना समजण्यासारखी असली तरी नव्याने बांधकाम सुरू असलेले पूल कोसळणे तसेच पूल बांधून काही वर्षे अथवा काही महिनेच झालेले असताना पूल कोसळणे या घटनाही घडल्या आहेत. नवीन पूल कोसळणे म्हणजे पुलाचे बांधकाम व्यवस्थित न होणे, यातच सर्व काही आले.

पुलाच्या बांधकामामध्ये निकृष्ट दर्जाचा माल वापरणे याची परिणती त्या पुलाच्या दुर्घटनेत होते. भारतात विकासकामांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार ही जगजाहीर बाब आहे. ग्रामपंचायत पातळीपासून केंद्रीय स्तरापर्यंत होत असलेल्या विकासकामांमध्ये ठेकेदार, प्रशासन, लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये होत असलेला आर्थिक मनोमिलाफ ही बाब आता लपून राहिलेली नाही. १९८५ साली राजीव गांधी हे देशाचे पंतप्रधान असताना त्यांनी भारतामध्ये होत असलेल्या विकासकामांमध्ये एक रुपयांपैकी केवळ १५ पैसे विकासकामांवर खर्च होत असून ८५ पैसे हे भ्रष्टाचारात जात असल्याचे जाहीरपणे सांगितले होते. पूल दुर्घटनेमध्ये अनेक वर्षे जुने, धोकादायक अवस्थेत झालेल्या पूल दुर्घटनेला पूर्णपणे त्या त्या भागातील प्रशासनच जबाबदार असते. पुलनिर्मितीला ठरावीक वर्षाचा कालावधी लोटल्यावर त्या पुलाचे पाडकाम करून त्या ठिकाणी नवीन पुलाची उभारणी करणे हे प्रशासनाचे कर्तव्य असते. जुनाट पुलांचा वापर म्हणजे अपघातांना निमंत्रण हे समीकरण ठरलेलेच असते. दोन्ही प्रकारातील पुलांच्या दुर्घटना झाल्यावर या अपघातांची शासन जबाबदारी स्वीकारते, हे आजतागायत कधीही पाहावयास मिळालेले नाही. केवळ राजकीय नेत्यांची घटनास्थळी गर्दी, पीडितांचे सांत्वन, स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांना दमदाटी, बदली अथवा निलंबनाचे ठरलेले सोपस्कर व मृतांच्या तसेच जखमींच्या परिवाराला आर्थिक मदत हा सर्व प्रकार ठरलेलाच असतो. त्यात कोणताही बदल पाहावयास मिळत नाही. पुलाचे अपघात कोठेही घडले तरी प्रकार हाच घडत असतो. गुजरातमधील पद्रा तालुक्यातील मही नदीवर पूल कोसळल्याने जवळपास १५ जणांचा मृत्यू झाला. पूल कोसळल्यानंतर नदीत पडल्याने काहीजण जखमी झाले. काहीजणांना वाचविण्यात स्थानिक






रहिवाशांमुळे शक्य झाले. या पूल दुर्घटनेची दखल पंतप्रधान मोदी यांनी घेतली. हा पूल जवळपास ४५ वर्षे जुना असून या पुलाच्या दुरवस्थेबाबत, असुरक्षितपणाबाबत अभियांत्रिकी अहवालही अनेकदा प्रकाशित झाले होते. स्थानिक राजकीय नेत्यांनीही त्या प्रकरणी आवाजही उठविला होता. पण प्रशासनाने लक्ष दिले नाही. त्यामुळे स्थानिक प्रशासनाच्या निष्काळजीपणावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविकच आहे. कारण या घटनेला सर्वस्वी स्थानिक प्रशासनच जबाबदार आहे.

१९८६ मध्ये बांधलेला हा पूल मुजपूर आणि गंभीर गावांना जोडणारा होता. गेल्या काही वर्षांपासून या पुलावर दृष्यमान झीज दिसत होती. रस्ते आणि इमारत (आर अँड बी) विभागाला पाठवलेल्या पत्रांच्या प्रती समोर आल्या आहेत, ज्यात पुलाच्या खराब अवस्थेबाबत स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. ऑगस्ट २०२२ मध्ये वडोदरा जिल्हा पंचायतीचे सदस्य हर्षदसिंह परमार यांनी एक पत्र लिहून सरकारला इशाराही दिला होता. संरचनात्मक मूल्यांकन अहवालात हा पूल 'वापरासाठी अयोग्य' ठरविण्यात आला होता. तरीही, कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. पूल कोसळेपर्यंत त्यावर वाहनांची ये-जा अनिर्बंधपणे सुरू होती. या घटनेने गुजरातमधील जुन्या पायाभूत सुविधांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. गंभीर पूल दुर्घटनेने राज्यभरातील जुन्या पुलांचे आणि इतर संरचनांचे ऑडिट करण्याची मागणी तीव्र झाली. महाराष्ट्रातील पुण्यामध्येही काही दिवसांपूर्वीच कुंडमाळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला, ज्यात काही पर्यटक वाहून गेले. हा पूल काही दिवसांपूर्वीच वापरासाठी बंद करण्यात आला होता, पण तरीही लोक त्यावर फिरत होते. या दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला, तर ३२ जण जखमी झाले होते. नऊ वर्षांपूर्वी महाराष्ट्रात झालेली महाड पूल दुर्घटना अजूनही लोकांच्या स्मरणात आहे. तब्बल तेरा दिवस या दुर्घटनेतील लोकांना शोधण्याचे शोधकार्य सुरूच होते. या अपघातात महाडजवळील सावित्री नदीच्या पात्रात दोन एसटी बस आणि एक तवेरा कारही वाहून गेली होती. १८ ते २० जणांचा महाड दुर्घटनेत मृत्यू झाला होता. दुर्घटना घडल्यावर काही काळ चर्चा होते. दुर्घटना कशामुळे घडली असेल, त्यावर विचारमंथन होते. काही वेळा समिती नेमली जाते. दुर्घटनेनंतर निर्माण झालेला जनप्रक्षोभ शमविण्यासाठी काही अधिकाऱ्यांवर खापर फोडताना त्यांची बदली व वेळ पडल्यास निलंबनही केले जाते. पुढे त्या समितीचा काय अहवाल आला, काय कारवाई झाली, हे कोणालाही माहिती पडत नाही. कारण त्यानंतर इतक्या घटना घडतात की, जुन्या घटनांचे लोकांना विस्मरण होत असते. पूल दुर्घटनेबाबत ठेकेदाराला अथवा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई काय झाली? ठेकेदाराच्या कंपनीला काळ्या यादीत टाकले का, याचेही कोणाला स्वारस्य नसते. जुन्या पुलांवरील वाहतूक शक्य तितक्या लवकर बंद करून पाडकाम न झाल्यास अपघाताच्या घटनांना आळा बसणार नाही आणि अपघातामध्ये घडणाऱ्या अपघातातील मृत्यूचे तांडवही थांबणार नाही. नवीन पूल कोसळल्यावर सदोषपणा अथवा निकृष्ट बांधकाम उजेडात येते. पण जुनाट, जीर्ण झालेल्या पुलांवर तरी तोडगा काढणे आपणास शक्य आहे. त्यासाठी जनतेमध्ये जागृती असणे आवश्यक आहे. जनसामान्यातील जनजागृतीचा रेटा वाढला की, प्रशासनालाही माघार घ्यावी लागते, निर्णय घ्यावा लागतो. जुनाट पुलावरील वाहतूक थांबविण्याबाबत शीघ्र कृती होणे काळाची गरज आहे.

# शशिकांत शिंदे शरद पवार गटाचे नवे प्रदेशाध्यक्ष

# जयंत पाटील यांच्या राजीनाम्यावर शिक्कामोर्तब

## पदावरून बाजूला होण्याची हीच योग्य वेळ; शिंदेंपुढे संघटना बळकट करण्याचे आव्हान

**मुंबई (वृत्तसंस्था)–राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी अखेर आमदार शशिकांत शिंदे यांची निवड झाली आहे. पक्षाच्या आज झालेल्या बैठकीत विद्यमान प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर एकमताने शशिकांत शिंदे यांची त्या पदावर निवड करण्यात आली. या निवडीमुळे जयंत पाटील यांच्या राजीनाम्याविषयी गत ४ दिवसांत निर्माण झालेला संभ्रम संपुष्टात आला आहे. दरम्यान, शरद पवार गटाचे अनेक नेते सध्या सत्ताधारी महायुतीत जात आहेत. शशिकांत शिंदे यांच्यापुढे पक्ष एकसंध ठेवण्याचे मोठे आव्हान आहे.शशिकांत शिंदे हे पक्षाच्या स्थापनेपासूनच शरद पवार यांचे खंदे सहकारी राहिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडखोरीवेळी त्यांनी पवारांची निष्ठेने साथ दिली. पश्चिम महाराष्ट्रातील प्रभावशाली नेतृत्व म्हणून त्यांची ओळख असून, त्यांना संघटनात्मक कामाचा दांडगा अनुभव आहे. शशिकांत शिंदे यांच्या पुढे संघटना बळकट करण्याचे मोठे आव्हान आहे.**



गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या बदलाची चर्चा सुरू होती. जयंत पाटील यांनी गेल्या सात वर्षांपासून पक्षाची धुरा सांभाळली. गत १० जून रोजी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात जयंत पाटील पदमुक्त होण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची चर्चाही सुरू झाली होती. आज अखेर शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून घोषणा करण्यात आली. आता शशिकांत शिंदे यांच्यावर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला चांगला विजय मिळवून देण्याची जबाबदारी असणार आहे.

दरम्यान, मी राष्ट्रवादीपासून लांब जाईन असा विचार करू नका, प्रदेशाध्यक्षांना २ वर्षांचा कालावधी असतो. पण, मला पवार साहेबांनी ७ वर्ष संधी दिली. मी पदावरून बाजूला होण्याची हीच योग्य वेळ आहे, असे जयंत पाटील यांनी सांगितले.शशिकांत शिंदे यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील हुमगाव आहे. वाणिज्य शाखेचे पदवीधर असलेले शिंदे माथाडी कामगार चळवळीतील प्रभावी नेते म्हणूनही ओळखले जातात. त्यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९६३ रोजी झाला. वडील जयवंतराव शिंदे आणि आई कौसल्या शिंदे यांच्या सुसंस्कृत आणि प्रेमळ वातावरणात त्यांचे बालपण गेले.ते १९९९ मध्ये प्रथमच जावळी विधानसभा मतदारसंघातून १२,००० मतांच्या फरकाने निवडून आले. पुढे त्यांनी कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाचे जलसंपदामंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळली. २००९ ते २०१४ या कालावधीत त्यांनी कोरेगाव मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आणि त्या वेळी शालिनी पाटील यांचा पराभव केला होता.शशिकांत शिंदे हे दोन पंचवार्षिक जावळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राहिले असून त्यानंतर दोन पंचवार्षिक कालावधीसाठी कोरेगावचे आमदारही होते. मात्र, २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत त्यांचा पराभव शिवसेनेच्या महेश शिंदे यांनी केला.

पराभवानंतरही शशिकांत शिंदे यांनी पक्षाशी निष्ठा कायम ठेवत शरद पवारांच्या गटात सक्रिय काम सुरू ठेवले. पक्षाने त्यांना विधान परिषदेवर पाठवले असून ते शरद पवार गटाचे मुख्य प्रतोद म्हणून कार्यरत आहेत.आता त्यांच्यावर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## कोल्हापूरचे माजी नगरसेवक दिलीप पोवार, उत्तम कोराणे यांचा भारतीय जनता पार्टीत प्रवेश

**दैनिक राज आनंद । मुंबई । प्रतिनिधी**

कोल्हापूरचे काँग्रेसचे माजी नगरसेवक दिलीप पोवार, सरस्वती पोवार, राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक उत्तम कोराणे यांच्यासह उबाठा तसेच शरद पवार गटातील अनेक कार्यकर्त्यांनी मंगळवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खा. धनंजय महाडिक, आ. अमल महाडिक, आ. सुधीर गाडगीळ, प्रा. जयंत पाटील, मुरलीधर जाधव, विश्वराज महाडिक, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. या सर्वांचे पक्षात स्वागत करताना प्रदेशाध्यक्ष श्री. चव्हाण म्हणाले की या सर्वांच्या साथीमुळे कोल्हापुरातील विकासाची कामे अधिक गतीने पूर्ण होतील. प्रवेश केलेल्या सर्वांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विकासासाठी भाजपा मध्ये प्रवेश केला आहे. या सर्वांच्या विश्वासास सर्व पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते पात्र ठरू अशी ग्वाही त्यांनी दिली. श्री. पोवार आणि श्री. कोराणे यांच्या प्रवेशामुळे आगामी महापालिका निवडणुकीमध्ये भाजपाला मोठे यश मिळेल, असा विश्वास खा. धनंजय महाडिक यांनी व्यक्त केला. श्री. पोवार हे पाच वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. करवीर तालुक्यातून भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये व्हिजन ग्रूपचे अध्यक्ष जनसुराज्य चे संताजी घोरपडे, काँग्रेसचे प्रसाद जाधव, वैभवराज राजेभासले, राजेंद्र थोरवडे तसेच मुंबईतील उबाठा गटाचे मंदार राऊत, संकेत रुद्र यांचा समावेश आहे.

## मा.आ.संजयमामा शिंदे यांच्या हस्ते शेटफळ येथे नागनाथ तलाव कल्लोळ पायऱ्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन संपन्न

**सोलापूर । प्रतिनिधी**

मौजे शेटफळ (ता. करमाळा) येथे महाराष्ट्र शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या श्री नागनाथ देवस्थान कल्लोळ तलाव पायऱ्यांचे (९० लाख किंमतीचे) बांधकाम प्रकल्पाचे भूमिपूजन माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या शुभहस्ते पार पडले.



या कार्यक्रमास विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. व्यासपीठावर चिखलठाणचे माजी सरपंच चंद्रकांतकाका सरडे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, सतीशबापू शेळके, उद्धवदादा माळी, आण्णासाहेब पवार, बेरे सरपंच, मोहम्मदभाई, रोहिदास सातव, अशोक तकीक, उमरड गावचे माजी सरपंच प्रमोद बदे, वांगी नं. ३ चे सरपंच मयूर रोकडे, सोमनाथ रोकडे, कुगावचे चेअरमन सचिन गावडे, समाधान देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी शेटफळ गावचे माजी सरपंच विकास गुंड, सद्य सरपंच काका गुंड, पांडुरंग लबडे, हभप बापू महाराज, सचिन पोळ, सचिन दिलीप पोळ, शिवसेना तालुका प्रमुख नवनाथ गुंड, तुकाराम चोरगे, भाऊसाहेब साबळे, पारस गुंड, बाबुराव चोरगे, विठ्ठल गुंड, सुहास पोळ, बापूराव पोळ, राहुल लबडे, आप्पा लबडे, पिल्लू पोळ यांनी विशेष परिश्रम घेतले.या भूमिपूजन सोहळ्यामुळे पर्यटनदृष्ट्या महत्त्व असलेल्या नागनाथ तलाव परिसराचा विकास होऊन गावाच्या सामाजिक व आध्यात्मिक जीवनात सकारात्मक बदल घडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महाराष्ट्रात ब्राह्मणांचे फार चालत नाही:पण उत्तर भारतात फार चालते –नितीन गडकरी

### आपण जात–पात मानत नसल्याचेही केले स्पष्ट

**नागपूर (वृत्तसंस्था)**–भाजपचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात ब्राह्मण समाजाला फारसे महत्त्व नसल्याची खंत व्यक्त केली आहे. महाराष्ट्रात आमच्या जातीला फारसे महत्त्व नाही. पण उत्तर भारतात आमचे फार चालते, असे ते म्हणालेत. दरम्यान, महाराष्ट्राचे नेतृत्व सध्या देवेंद्र फडणवीस करत आहेत. तसेच गडकरी स्वतःही केंद्रीय मंत्री आहेत. त्यामुळे त्यांच्या या विधानावर समाजात धीरगंभीर चर्चा सुरू झाली आहे.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या अनेक भाषणांत आपण जात, धर्म व पंथ मानत नसल्याचे स्पष्ट केले आहे. पण त्यांनी नागपुरातील एका कार्यक्रमात स्वतःच्या जातीला महाराष्ट्रात फारसे महत्त्व नसल्याची खंत व्यक्त केली. नितीन गडकरी म्हणाले की, शिक्षण ही आपली शक्ती आहे. शिक्षण घेतल्याशिवाय कोणत्याही समाजाचा विकास होऊ शकत नाही. आज अनेक लोक ट्रक ड्रायव्हर, चहाचे दुकान अशी छोटी-मोठी कामे करताना दिसून येतात. त्यांच्यामध्ये चांगले कला कौशल्य असूनही ते केवळ शिक्षणाअभावी मागे पडलेत. त्यामुळे सर्वांनी चांगल्या पद्धतीने सर्व भाषांचे शिक्षण घ्यावे.

नितीन गडकरी पुढे म्हणाले, मी ब्राह्मण आहे. पण इथे ब्राह्मणांचे फार चालत नाही. त्यांना इथे फारसे महत्त्वही नाही. पण उत्तर प्रदेश व बिहारमध्ये त्यांना खूप महत्त्व आहे. तिकडे दुबे, मिश्रा, पांडे, चतुर्वेदी आदींची खूप चलती असते. त्यांचा तिथे फार मोठा दबदबा आहे. मी एकदा उत्तर प्रदेशातील एका कार्यक्रमाला गेलो. तिथे सर्वजण माझ्याकडे आले. म्हणाले, पंडित अटलबिहारी वाजपेयी यांच्यानंतर आपल्या समाजाचा कुणी दमदार नेता असेल तर ते तुम्ही आहात. मी म्हणालो, मीच का? ते म्हणाले कारण तुम्ही ब्राह्मण आहे. मी म्हणालो, मी जात-पात मानत नाही. तुम्ही मला हे का सांगत आहात? गडकरी म्हणाले, खरी गोष्ट ही आहे की, लोक तुम्हाला तुमच्या कामाने, कार्याने, गुणवत्तेने, गुणाने, कौशल्याने



पसंत करतात. मी आता डॉक्टर नाव लावत नाही. मी ज्या क्षेत्रात काम करतो तिथे ७ विश्वविक्रम झालेत. माझा अनुभव असा आहे की, तुम्ही शिक्षणात कितीही चांगले मार्क्स घेतले, तरी तुम्ही यशस्वी व्हाल याची कोणतीही खात्री नाही. मी लॉ कॉलेजमध्ये शिकत होतो. तेव्हा जे विद्यार्थी फर्स्ट क्लास व मेरिटमध्ये येत होते, त्यांची वकिली आज फार चालत नाही. पण आमच्यासारखे जे विद्यार्थी बदमाशी करत होते, ते आज खूप मोठे वकील झालेत. ते कोटीत कमाई करत आहेत.त्यामुळे आपण क्लालिफिकेशन, स्किल व सस्केस यातील फरक समजून घेतला पाहिजे. हजरजबाबीपणा व ज्ञानासह काम कसे करायचे हे समजून घेतले पाहिजे. पण एक गोष्ट खरी आहे की, आपल्याला शिक्षणाची खूप जास्त गरज आहे. मी आमदार होतो, तेव्हा सर्व आमदारांना इंजिनिअरिंग कॉलेज मिळाले होते. पण आतापर्यंत माझी एकही शिक्षणसंस्था नाही. मला एक इंजिनिअरिंग कॉलेज मिळाले होते, पण मी ते नागपुरातील एका मुस्लिम संस्थेला दिले. त्या कॉलेजातून आजतागायत मुस्लिम समुदायाचे ८-१० विद्यार्थी इंजिनिअर झालेत. कारण, या समाजाला त्याची फार गरज होती.ज्ञान मिळवले तर जीवनात यश मिळेल. नाही तर मंदिरात जा, मशिदीत जा, १०० वेळा नमाज पढा, पण इंग्रजी येत नसेल, गणित येत नसेल, विज्ञान येत नसेल तर प्रशासन समजत नसेल, तर कसे जमणार? असा सवालही नितीन गडकरी यांनी उपस्थितांशी संवाद साधताना उपस्थित केला.

## प्रवीण गायकवाड हल्ला प्रकरणी मराठा समाज आक्रमक

### १८ जुलैला अक्कलकोट बंदची हाक

**सोलापूर (वृत्तसंस्था)**–संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर रविवारी अक्कलकोट येथे झालेल्या शाईफेक प्रकरणानंतर राज्यात मराठा समाज आक्रमक झाला आहे. या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी मराठा समाजाची आज सोलापुरात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीमध्ये प्रवीण गायकवाडांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ १८ जुलै रोजी अक्कलकोट बंद पुकारण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला आहे.मराठा समाजाची ही बैठक सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. बैठकीत प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. यावेळी हल्लेखोर आरोपींना तात्काळ अटक करावी आणि त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.



अक्कलकोट बंद यशस्वी करण्यासाठी उद्या अक्कलकोटमध्ये नियोजनाची स्वतंत्र बैठक घेण्यात येणार आहे. या बंदमध्ये जन्मेजयराजे भोसले देखील सहभागी होतील, अशी माहिती बैठकीनंतर मराठा समाजाच्या समन्वयकांनी दिली. दरम्यान, बैठकीत काही काळासाठी गोंधळ उडाला होता. अमोलराजे भोसले यांच्याबाबत एका कार्यकर्त्याला गैरसमज झाल्याने क्षणिक तणाव निर्माण झाला. मात्र, समन्वयकांनी हस्तक्षेप करत गैरसमज दूर केला आणि नंतर बैठक सुरळीत पार पडली, अशी माहिती देण्यात आली आहे. प्रवीण गायकवाड यांच्यावर हल्ला म्हणजे समस्त मराठा समाजावर हल्ला, अशी प्रतिक्रिया मराठा समाजातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी देत आहेत. संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर हल्ला केलेले सर्व संशयित आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. तुरुंगात शिक्षा भोगत असलेले आरोपी पॅरोलवर बाहेर आलेले आहेत. प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक करणारे संघटीत गुन्हेगार आहेत. त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई होत नाही, तोपर्यंत मराठा समाज गप्प बसणार नाही. अक्कलकोट बंदनंतर सोलापूर बंद, त्यानंतर मोठे मोठे मोर्चे काढणार आहेत, असे सकल मराठा समाजाचे माऊली पवार, मराठा क्रांती मोर्चाचे दिलीप कोल्हे यांनी म्हटले आहे.

# गणपतीसाठी कोकणात एसटीच्या जादा ५००० बसेस धावणार-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**नवी मुंबई (वृत्तसंस्था)**

२७ ऑगस्ट २०२५ रोजी श्री गणरायाचे आगमन होत असून बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. मुंबईतील कोकणाच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या गणपती उत्सवासाठी एसटी महामंडळाने यंदा २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान ५००० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते गणपती उत्सवाच्या जादा वाहतूकीच्या अनुषंगाने मंत्रालयातील आपल्या दालनात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते. या बैठकीला महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थिती होते. मंत्री सरनाईक म्हणाले की, गणपती उत्सव म्हणजे कोकणच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा सण आहे. किंबहुना, गणपती बाप्पा , कोकणचा चाकरमानी व एसटी यांचे एक अतुट नाते आहे. त्यामुळे दरवर्षी गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सेवेसाठी नफ्या -तोट्याचा विचार न करता एसटी धावत असते. यंदा सुमार ५००० जादा गाड्या कोकणातील रस्त्यावर धावतील. सदर बसेस आरक्षणासाठी npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असून, सदर बसेसचे आरक्षण बसस्थानकावर किंवा महामंडळाच्या MSRTC Bus Reservation पव्दारे, उपलब्ध होणार आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या आषाढी एकादशीच्या यात्रेसाठी देखील एसटी महामंडळाने ५२०० जादा बसेस सोडल्या होत्या. त्याला भाविक - प्रवाश्यांचा अभुतपुर्व प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे गणपती उत्सवासाठी देखील एसटीने तब्बल ५००० जादा बसेस उपलब्ध करून देण्याचे निश्चित केले आहे.

**२२ जुलै पासून गट आरक्षणाला सुरुवात महिला व ज्येष्ठांना सवलत**

जादा बसेस मध्ये व्यक्तिगत आरक्षणा बरोबरच गट आरक्षणासाठी अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के, ज्येष्ठ नागरिकांना व महिलांना ५० टक्के तिकिट दरात सवलत दिली जाणार आहे. गट आरक्षण २२ जुलै पासून सुरू होत आहे.२३ ऑगस्ट पासून मुंबई, ठाणे, पालघर, या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून या जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. गतवर्षी ४३०० बसेस सोडण्यात आल्या होत्या.गणेशोत्सवादरम्यान एसटीची वाहतूक सुरळीत होण्यासाठी बसस्थानक व बसथांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. तसेच कोकणातील महामार्गावर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथक देखील तैनात करण्यात येणार आहेत.



# केज शहरात मटका आणि गुटख्याचा वाढला जोर, पोलीस अधिकाऱ्यांना कशाचाच नाही घोर!

**केज । प्रतिनिधी**

केज शहरात पुन्हा एकदा मटका, गुटखा, आणि अन्य अनधिकृत व्यवसायांनी आपला पाय पसरायला सुरुवात केली आहे. शहरातील अनेक भागांमध्ये खुलेआम मटक्याचे आकडे चालू असून, गुटख्याची विक्री देखील निर्भयपणे सुरू आहे. विशेष म्हणजे या सर्व गोष्टी पोलीस प्रशासनाच्या नजरेआड सुरू आहेत, की मुद्दाम दुर्लक्ष केले जात आहे, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना सतावतो आहे.

कधी काळी उपविभागीय पोलीस अधिकारी पंकज कुमावत यांच्या कार्यकाळात केज शहरातील तसेच तालुक्यातील मटका, गुटखा, आणि इतर अनधिकृत धंद्यांवर धडक कारवाई झाली होती. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन शहर स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे ते बीड जिल्ह्यात एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले गेले होते. मात्र त्यांच्या बदलीनंतर केज शहरातील परिस्थिती पुन्हा ढासळल्याचे चित्र दिसत आहे. मटक्याचे अड्डे, गुटख्याची दुकाने, आणि सट्टा व्यवहार खुलेआम सुरु असून, पोलीस यंत्रणा या सर्वांबाबत दुर्लक्ष करत असल्याचे आरोप होत आहेत. गुन्हेगारी प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळत असल्याने युवकांची वाटचाल चुकीच्या दिशेने सुरू झाली आहे. पालकवर्ग आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्यात संतापाची लाट उसळली आहे. प्रशासनाने या अनधिकृत धंद्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन, कारवाईचे निर्देश देणे आणि कारवाई होणे अत्यावश्यक बनले आहे. अन्यथा पोलीस यंत्रणेवरील विश्वास डळमळीत होईल, आणि गुन्हेगारीला अधिक उधाण येईल, अशी भीती व्यक्त होत आहे.




# सुनिता गीते यांनी आत्मदहन करून घेतल्यास मुलास नोकरीवर रुजू करून घेणार का?

## समाज कल्याण प्रदेश उपसंचालक यांच्या आदेशाला बीड येथील अधिकाऱ्यांकडून केराची टोपली

**बीड । प्रतिनिधी**

श्रीनाथ गोविंद गित्ते हे प्राथमिक आश्रमशाळा वसंतनगर, ता.परळी (वै.), जि.बीड या शाळेत मा. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक विभाग) छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश दि. ३०/०७/२०२५ नुसार शाळेवर रूजू होण्यासाठी वारंवार जाऊन देखी रूजू करून घेतलेले नाही.

आश्रम शाळा व्यवस्थापन व समाज कल्याण बीड मधील अधिकाऱ्याला भ्रष्टाचारणे एवढे बरबटले आहेत. त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशाचं देणे घेणे नाही असंच दिसतआहे व त्यांनी त्याला केराची टोपली दाखवली आहे. आर्थिक व्यवहार, घेवान घेवाण केला तरच नोकरी वर रुजू करून घेऊ अशी भाषा आश्रम शाळा व्यवस्थापन समाज कल्याण येथील अधिकारी यांच्यावर आरोप करण्यात आला आहे.

पतीच्या निधनानंतर अनुकंपावर घरातील कुठलाही व्यक्ती घेतला जातो प्रचंड संघर्ष करून स्वतः सुनिता गीते यांनी वरिष्ठ कारल्याच्या पायऱ्या झिजवल्या, वरिष्ठांनी रुजू करून देण्याचे आदेशही दिले. मात्र बीड येथे भ्रष्टाचाराची कीड खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यांच्या मुलास अद्याप नोकरी वरती रुजू करून घेतला नाही. त्या स्वतः कर्करोगाने त्रस्त असुन उपचारासाठी आर्थिक अडचण आहे. मागील अनेक वर्षापासुन पाठपुरावा करून माझ्या मुलाला अनुकंपावर नियुक्ती आदेश मिळालेला असुन देखील संबंधीत शाळा रुजू करून घेण्यास मनाई करत आहेत.



संबंधीत शाळेवर अथवा बीड जिल्हयात कोणत्याही शाळेत अथवा कार्यालयात माझ्या मुलाला दि. २१/०७/२०२५ पर्यंत रुजु करून न घेतल्यास आपल्या कार्यालयासमोर दि. २३/०७/२०२५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे या सर्व गोष्टीस शासन व आपले कार्यालय जबाबदार राहील. आर्थिक, माणसिक, शारीरिक परिस्थिती आणि मनस्थिती ढासळली आहे. सन २०१६ पासुन ते आज पर्यंत वारंवार बीड, संभाजीनगर, पुणे, मुंबई या या ठिकाणी चकरा मारून अक्षरशः हातबल व थकले आहेत, मुलाला नोकरीवर रुजू करून घ्या या मागणीसाठी त्या २३ जुलै २५ रोजी बीड येथील कार्यालयाबाहेर आत्मदहन करणार आहे.अशा स्वरूपाचे लेखी निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व समाज कल्याण कार्यालय बीड येथे दिले आहे.

# जतीन शेख चे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

राज्य सरकारकडून दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. गेल्या काही वर्षांत जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी शासनातर्फे आयोजित शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून तयारी करणार्या विद्यार्थ्यांनी उच्च गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. अभ्यासासाठी मर्यादित साधने असूनही या जतीनने अथक मेहनतीच्या जोरावर यशाचे शिखर गाठले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी २०२५ ( पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती ) चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून त्यामध्ये कोल्हापूर महानगरपालिकेच्या महात्मा फुले विद्यालय फुलेवाडी या शाळेचा विद्यार्थी जतीन जाहेर शेख याने ३०० पैकी २५४गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शिष्यवृत्तीस पात्र ठरला आहे. त्याला श्री. कुलदीप जठार सर



,श्री. सागर संकपाळ सर व त्याचे आईवडील यांचे मार्गदर्शन लाभले तर मुख्याध्यापिका सौ.अनुराधा शिंत्रे मॅडम यांची प्रेरणा मिळाली.

# युवा कौशल्य संस्था कौशल्य प्रशिक्षणा साठी महिलांची एकवटली उपस्थिती

## नारूर गावात सकारात्मक पाऊल



**नारूर । प्रतिनिधी**

नारूर (ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग) गावातील महिलांनी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत, कौशल्य प्रशिक्षणासाठी एकत्र येत उत्साहाने सहभाग नोंदवला. नुकत्याच एका संध्याकाळी नारूर गावात झालेल्या बैठकीला विविध वयोगटातील महिला, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत ब्युटी पार्लर, शिवणकाम, पाककला, अन्न प्रक्रिया यासारख्या महिलांसाठी उपयुक्त कोर्सेसबाबत माहिती देण्यात आली. युवकांसाठी संगणक, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रिशियन यांसारख्या रोजगारक्षम प्रशिक्षण कोर्सेसची माहिती दिली गेली.

एक महिला सहभागी म्हणाल्या,


घराच्या जबाबदाऱ्या सांभाळून जर गावातच प्रशिक्षण मिळाले, तर आम्हालाही स्वतःचं काहीतरी करता येईल. ही संधी आमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे.

कार्यक्रमात ग्रामस्थांनीही पुढाकार घेत महिलांना प्रोत्साहन दिले. यामुळे नारूर गावात नव्या आशेचा किरण दिसत आहे.

# मावेजा प्रकरण न्यायप्रविष्ट असताना सुरू आहे बेकायदेशीर रस्त्याचे रुंदीकरण; शेतकऱ्यांचा आमरण उपोषणाचा इशारा

**केज । प्रतिनिधी**

मौजे सुकळी ते गोटेगाव दरम्यान २० फूट रस्त्याच्या मावेजा प्रकरणाची सुनावणी सध्या मा. उच्च न्यायालय खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे सुरु असतानाही स्थानिक प्रशासनाकडून कोणताही कायदेशीर मावेजा न देता तब्बल १०० फूट रुंदीकरणाचे बेकायदेशीर काम युद्धपातळीवर सुरु असल्याची संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. या रुंदीकरणासाठी शेतकऱ्यांच्या खासगी मालकीच्या जमिनी बळकावण्यात येत असून, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी जवळपास ८० फूटपर्यंत जमीन जात आहे. एवढेच नव्हे तर, जमिनीतील अनेक झाडांची कत्तलही करण्यात येत असून, यामुळे पर्यावरणीय हानी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



**कायद्याला हरताळ, शेतकऱ्यांच्या हक्काला हरताळ**

भूमिसंपादन व पुनर्वसन विषयक २०१३ मधील अधिनियमानुसार, कोणतीही जमीन अधिग्रहित करताना योग्य मावेजा, पारदर्शक प्रक्रिया व पुनर्वसनाची तरतूद आहे. मात्र, सदर प्रकरणात या सर्व कायदेशीर प्रक्रिया डावलून प्रशासनाने बळजबरीने काम सुरु केले असून, शेतकऱ्यांचा आवाज दुर्लक्षित केला जात आहे.

**शेतकऱ्यांनी घेतला आक्रमक पवित्रा**

या प्रकाराविरोधात शेतकऱ्यांनी यापूर्वी संबंधित विभागास लेखी अर्ज, निवेदन तसेच रास्ता रोकोसारख्या आंदोलने केली. मात्र अद्याप कोणतीही सकारात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी २२ जुलै २०२५ पासून केज येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा अमर गायकवाड , शाहु गायकवाड अजित रांजनकर यांनी दिला आहे.

**अनुचित प्रकार घडल्यास जबाबदारी प्रशासनाची**

या आंदोलनादरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास त्यास पूर्णतः आपले कार्यालय आणि जिल्हा प्रशासन बीड जबाबदार असेल, असा स्पष्ट इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

स्थानिक प्रशासनाने याप्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून रस्त्याचे रुंदीकरण थांबवावे आणि योग्य मावेजा दिल्यानंतरच पुढील कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# कर्म करत रहा फळ मिळत राहते–समृद्धी दिवाणे

**केज । प्रतिनिधी**

दिनांक १५ जुलै २०२५ रोजी साने गुरुजी निवासी विद्यालयात गुणवत्ता विकास वाढ संदर्भाने गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाणे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली केज तालुक्यातील केंद्र प्रमुख व मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळांचे विस्तार अधिकारी,साधन व्यक्ती यांची बैठक संपन्न झाली.केज तालुक्या तील शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षकांनी प्रामाणिक पणे आपले कर्म करावे कर्म प्रामाणिक असेल तर फळ मिळते. शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी शाळां मधून वेगवेगळे उपक्रम घ्यावेत शिक्षकाने कृतीशील बनावे. शाळांचा शैक्षणिक दर्जा व भौतिकदर्जा उंचावणे हे आपल्या सर्वांचे काम आहे उपक्रमशील शाळा झपाट्याने पुढे सरकताना दिसतआहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना उपक्रमशील बनवा त्याचाच एकभाग सध्या वाचन कुठेतरी थांबलेले आहे वाचन संस्कृती पुन्हा एकदा जोमाने राबवली पाहिजे. वाचनाची आवड विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्या साठी शाळेत अवांतर वाचनाची पुस्तके पुस्तक पेढीच्या माध्यमातून,वाचनालया च्या माध्यमातून शिक्षकांनी उपलब्ध करून द्यावेत.यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन व स्वतः स्पॉन्सर शिप घेऊन सहा शाळांना अनुराग पुस्तकालय आंबेजोगाई चे साहित्य अभिजीत जोंधळे यांच्या माध्यमा तून पुस्तक पेटी भेट देण्यात आली.एका पेटीत पुस्तकांचे ६० ते ७० नग वयानुरूप उपलब्ध आहेत.इतरही शाळांना पुस्तकेउपलब्ध करून देण्यात येतील असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.



यावेळी साहित्यिक अभिजीत जोंधळे यांनी पुस्तक पेटी हा उपक्रम गेली दहा वर्षापासून ज्या शाळा वाचन संस्कृती रुजवतील अशा शाळांना देत असल्याचे सांगून या पेटीत पहिलीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाचन योग्य अशी पुस्तके असल्याचे मत व्यक्त केले.त्याच बरोबर शिक्षकांना वाचनीय अशी तीन ते चार पुस्तके ही या पेटीत आहेत.आपण मुलं वाचत नाहीत अशी तक्रार करतो पण मुलांना जर वाचनाला संधी उपलब्ध करून दिली नाही पुस्तके उपलब्ध करून दिली तर मुले निश्चितच वाचतात हे कर म्हणणारा कृतिशील शिक्षक असावा लागतो प्रतिकूलते वर मात करणारी पुस्तके मुलां समोर ठेवली म्हणजे मुले देखील त्यातून प्रेरित होतात प्रत्येक माणसाने आपण मोबाईलवर व्यर्थ किती वेळ घालवतो याचा विचार करावा त्या ऐवजी फक्त दहा मिनिटात दहा पाने पुस्तकातील वाचून होतील असाही निर्वाणीचा संदेश त्यांनी यावेळी बोलताना दिला. मुलं अनुकरणप्रिय असतात मोठी जे करतात तेच मुलं करतात म्हणून अगोदर मोठ्यांनी वाचायला सुरुवात करावी म्हणजे मुले आपोआप वाचतील.यावेळी गट शिक्षणाधिकारी लक्ष्मण राव बेडसकर,संस्था अध्यक्ष उद्धवराव कराड सर यांनीही मनोगत व्यक्त केले.सदर बैठकीस ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता चाटे,श्री.सुनील केंद्रे सर्व केज तालुक्याचे केंद्रप्रमुख सहा शाळांचे मुख्याध्यापक साधन व्यक्ती उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक प्रा. कविता गित्ते मॅडमयांनी केले तर सूत्रसंचालन श्री.चोले सर यांनी केले तर आभार केंद्र प्रमुख संजय चवरे सर यांनी मांडले.पुस्तक पेटी दिलेल्या शाळा साने गुरुजी निवासीविद्यालय केज,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदी,
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, भाटुंबा,माध्यमिक शाळा,मस्साजोग जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कळमअंबा,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ यांना पुस्तक पेटी प्रदान करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077